# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधिक्षक
दिनांक:- ०३/०३/२०१७

## *संकल्प व्यसनमुक्ती शिबीराचा उद्‌घाटन कार्यक्रम संपन्न*

नक्षल प्रभावित, अतिसंवेदनशिल गडचिरोली जिल्हयातील विविध पोस्टे, उपाोस्टे व पोमके येथे कार्यरत पोलीस कर्मचाऱ्यांना नक्षल विरोधी अभियान, कोबिंग ऑपरेशन, एसआरपी, एलआरपी, नाईट ॲम्बुश तसेच रोड ओपनिंग सुध्दा करावी लागते. शिवाय काही कर्मचारी हे आपल्या कुंटुंबियापासुन दुर राहत असल्याने मानसिक तणावात जाऊन व्यसनांचे आहारी जातात. सोबतच अतिव्यसनाधीतेमुळे त्यांच्या कुंटुंबाची वाताहत होत असते. हे लक्षात घेवून मा. पोलीस अधिक्षक, डॉ. अभिनव देशमुख सो. यांनी जिल्हयातील अतिव्यसनाधिन पोलीस कर्मचाऱ्यांमध्ये बदल घडवून त्यांना व्यसनमुक्त बनविण्या करीता संकल्प व्यसनमुक्ती कार्यशाळा ही संकल्पना राबविली. याअंतर्गत आज दिनांक ०३/०३/२०१७ रोजी संकल्प व्यसनमुक्ती सत्र क्र. ०२ चा उद्‌घाटन कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी मा. पोलीस अधिक्षक, डॉ. अभिनव देशमुख सो., १९२ बटालियन सी.आर.पी.एफ. चे कमान्डंट श्री. मनोजकुमार, पोलीस उपअधिक्षक (गृह) श्री. गणेश बिरादार, तसेच सर्च फाऊंडेशन चे उपसंचालक श्री. तुषार खोरगडे, मानसोपचार तज्ञ डॉ. आरती बंग, पोलीस रुग्णालय गडचिरोलीचे डॉ. योगेश पडोळे हे उपस्थित होते.

जानेवारी महिन्यामध्ये संकल्प व्यसनमुक्ती केंद्र सत्र क्र. ०१ राबविण्यात आले. त्यामध्ये जिल्हा पोलीस व सी.आर.पी.एफ. चे २५ कर्मचारी यांनी सहभाग घेतला होता. या २५ जवानांपैकी १७ कर्मचाऱ्यांनी स्वत:ला व्यसनमुक्त केले आहे. स्वत:च्या मनावर ताबा मिळवत व्यसनापासून दुर जात एक नवीन आदर्श त्यांनी इतर व्यसनाधीन जवानांना दिला आहे. कार्यक्रमा दरम्यान या व्यसनमुक्त झालेल्या काही जवानांनी आपली मनोगते व्यक्त केली. तसेच व्यसनमुक्ती सत्र क्र. ०२ मध्ये सहभागी झालेल्या जवानांना मार्गदर्शनही केले. यानंतर प्रथम सत्रामध्ये व्यसनमुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांचे मा. मान्यवरांच्या हस्ते पुष्प देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. डॉ. देशमुख सरांनी व्यसनमुक्ती केंद्रातील उपस्थित सर्वांना मार्गदर्शन करीत स्वत:ला व्यसनांपासून कसे मुक्त करता येईल व 'आजचा दिवस' (आज मी

कोणतेही व्यसन करणार नाही) हा मुलमंत्र कसा जोपासता येईल याबाबत मार्गदर्शन केले व सर्वांना शुभेच्छा दिल्या. त्याचबरोबर कार्यक्रमाचे अतिथी १९२ बटालियन सी.आर.पी.एफ. चे कमान्डंट श्री. मनोजकुमार यांनीही सर्वांना मार्गदर्शन केले. सोबतच सर्च फाऊंडेशन चे उपसंचालक श्री. तुषार खोरगडे यांनीही सर्वांना मार्गदर्शन करत 'आजचा दिवस' हा मंत्र जोपासण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन पोउपनि तेजस्वी पाटील यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पोलीस उपअधिक्षक (गृह) श्री. गणेश बिरादार यांनी केले तर आभार प्रदर्शन संकल्प व्यसनमुक्ती केंद्राचे समुपदेशक श्री. विनोद पांडे यांनी केले.

–





